# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:11.02.2026** **वार:बुधवार**

---

1. जलसंपदा प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डकडून 15 हजार कोटी रुपये कर्ज - राज्य मंत्रिमंडळाचा निर्णय
2. राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन 23 फेब्रुवारीपासून
3. मुंबईत पहिला हवामान-विषयक विशेष सप्ताह आणि
4. विकसित भारतासाठी नव्या पिढीनं त्वरित जबाबदारी घ्यावी-ज्येष्ठ शास्त्रज्ञ रघुनाथ माशेलकर यांचं आवाहन

**राज्य मंत्रिमंडळ निर्णय**

राज्याच्या विविध भागातले जलसंपदा विभागाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी नाबार्डकडून 15 हजार कोटी रुपयांचं दीर्घ मुदतीचं कर्ज घेण्यास राज्य मंत्रिमंडळानं काल मान्यता दिली. याबाबत वार्ताहरांशी बोलताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले.....

**चाळीस प्रकल्प आणि शंभर कॅनल्स हे पूर्ण करण्याकरता आपण पंधरा हजार कोटी रुपये हे नाबार्डच्या माध्यमातनं दीर्घ मुदतीचं कर्ज घेण्याकरता मान्यता दिली आहे जे प्रकल्प आपण घेतलेले आहेत हे सगळे असे प्रकल्प आहेत की जे पुढच्या एक ते दोन वर्षात पूर्ण होऊ शकतात ज्यांचं अंतिम टप्प्याचं काम बाकी आहे कॅनॉल्स आहेत की ज्याची एफिशियन्सी संपलेली आहे त्याला नव्याने लाईनिंग करण्यात येणार असून आणि त्याचं अद्ययावतीकरण आपण करणार आहोत हे जे काही आपण जे प्रकल्प पूर्ण करणार आहोत साडेतीन लाख एकर आणि इकडे साडेचार लाख एकर अशी आठ लाख एकर जमीन ही ओलिताखाली येईल अशा प्रकारच्या या प्रकल्पाला आज मान्यता देण्यात आलेली आहे.**

पुणे जिल्ह्यातील पुरंदर विमानतळासाठी आवश्यक भूसंपादनाकरता सहा हजार कोटी रुपये कर्ज घेण्यासही बैठकीत मान्यता देण्यात आली. या प्रकल्पासाठी आवश्यक जमीन अधिग्रहण प्रक्रिया यावर्षी 1 जूनपर्यंत पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले असून यासाठी विशेष हेतू प्राधिकरणाची स्थापनाही करण्यात येणार आहे.

पुणे जिल्ह्याच्या इंदापूर तालुक्यातील रत्नपुरी मळा इथं 1 हजार एकर जमीन एमआयडीसीला हस्तांतरित करण्याचा निर्णय या बैठकीत घेण्यात आला.

कोल्हापूर जिल्ह्यात करवीर तालुक्यातल्या मौजे विकासवाडी इथं आंतरराष्ट्रीय दर्जाचं क्रिकेट मैदान उभारण्यासाठी 12 हेक्टरहून अधिक जमीन जिल्हा क्रिकेट संघटनेला मोफत देणं, बारामतीच्या जिल्हा क्रीडा संकुल अंतर्गत कटफळ इथं क्रीडा संकुलाकरिता 75 कोटी 13 लाख रुपयांच्या अंदाजपत्रकास मान्यता देण्यात आली आहे. राज्यस्तरीय विज्ञान प्रदर्शनात बक्षीस मिळविणाऱ्या विद्यार्थी, शिक्षक आणि प्रयोगशाळा परिचर यांना देण्यात येणाऱ्या बक्षिसाच्या रक्कमेत राज्य सरकारनं वाढ केली.

राज्यातील ग्रामीण आरोग्य सेवा अधिक सक्षम, रोगमुक्त आणि स्वयंपूर्ण करण्याच्या उद्देशानं राज्यात 'माझ गांव, आरोग्य संपन्न गाव' अभियान राबविण्यासही काल झालेल्या मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता देण्यात आली.

या बैठकीला उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मंत्री उपस्थित होते.

## सुनेत्रा पवार

राज्याच्या नवनियुक्त उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी काल मंत्रालयात आपल्या उपमुख्यमंत्री पदाचा पदभार स्वीकारला. तत्पूर्वी त्यांनी सिध्दीविनायक मंदिरात जाऊन गणरायाचे दर्शन घेतले. त्यानंतर चैत्यभूमीवर जाऊन भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना पुष्पचक्र अर्पण करून अभिवादन केले.

## अर्थसंकल्पीय अधिवेशन

राज्य विधिमंडळाचं अर्थसंकल्पीय अधिवेशन येत्या 23 फेब्रुवारीला सुरू होणार असून ते 25 मार्चपर्यंत चालणार आहे. येत्या 6 मार्च रोजी राज्याचा अर्थसंकल्प सादर करण्यात येणार आहे. विधानसभा आणि विधानपरिषदेच्या काल झालेल्या कामकाज सल्लागार समिती बैठकीत हा निर्णय घेण्यात आला.

## संसद

संसदेच्या दोन्ही सभागृहात काल अर्थसंकल्पावर चर्चा झाली. लोकसभेत काँग्रेसचे खासदार शशी थरूर यांनी आपले विचार मांडताना अर्थसंकल्पावर जोरदार टीका केली. राज्यसभेत शिवसेना खासदार मिलिंद देवरा यांनी चर्चेत सहभाग घेतला. जागतिक अस्थिरतेच्या काळात भारत स्थिरपणे उभा असल्याचं ते म्हणाले. दरम्यान लोकसभेचे सभापती ओम बिर्ला यांच्यावरचा अविश्वास दर्शक ठराव विरोधी पक्षांनी काल लोकसभेच्या महासचिवांना सादर केला. काँग्रेस, द्रमुक, समाजवादी पक्षासह विविध पक्षांच्या 118 सदस्यांनी याला पाठिंबा दिला आहे. या अविश्वास दर्शक ठरावावर जोपर्यंत निर्णय होत नाही, तोपर्यंत लोकसभेच्या कामकाजात सहभागी न होण्याचा निर्णय सभापती ओम बिर्ला यांनी घेतला आहे.

## क्लायमेट वीक

मुंबई हवामान सप्ताहाचं प्रथमच आयोजन करण्यात येणार आहे. 17 ते 19 फेब्रुवारी या कालावधीत देश परदेशातील प्रमुख नेते, उद्योग जगतातील आघाडीचे प्रतिनिधी, हवामान क्षेत्रातील नवोन्मेषक, आणि प्रतिनिधी सहभागी होणार आहेत. एका सत्रामध्ये निसर्ग, अन्न प्रणाली आणि मानव यांवर लक्ष केंद्रित केलं जाईल. प्रत्यक्ष अंमलात आणता येतील अशा हवामान उपाययोजनांचं प्रदर्शनही आयोजित करण्यात येणार आहे.

**विद्यापीठ**

विकसित भारतासाठी 2047 पर्यंत न थांबता, त्याआधीच नव्या पिढीनं पुढाकार घेऊन जबाबदारी स्वीकारली पाहिजे, असं आवाहन ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांनी केलं आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या 77 व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित समारंभात प्रमुख पाहुणे ते काल बोलत होते. यावेळी बोलताना डॉक्टर माशेलकर म्हणाले.....

**मला एक प्रश्न पडतो दोन हजार सत्तेचाळीस साठ पर्यंत थांबायला का हो त्याच्या आधी आपण का विकसित होऊ शकतो आणि ती क्षमता आपल्यामध्ये आहे कळत नाही आणि तो भारत कसा बनवायचा आहे आपल्याला तो संतुलित असला पाहिजे, सुसंस्कृत असला पाहिजे, सुरम्य असला पाहिजे, सुविद्या असला पाहिजे, समृद्ध असला पाहिजे, सुशासित असला पाहिजे आणि स्वानंदी असायला आणि हा जर बनवायचा असेल तर आपल्याला एक लक्षात ठेवावं लागेल की आपण यांच्याकडून आता कार्ती आहेत त्यांच्या कडनं आपण असं शिकलं की तो जर भारत घडवायचा असेल तर या मूल्यांवर त्यांनी दाखवलेल्या मूल्यावर तो उभा असला पाहिजे सेवा साधना, सर्जनशीलता आणि संवेदनशील या पायावर तो आपल्याला आज उधायचा आहे की आज हे जे सत्कार्ती आहेत त्यांचा सन्मान करताना आपण आपल्या भविष्याचा सन्मान करत आहोत असं भविष्य जे भारत घडवेल केवळ उंच इमारतीने नव्हे तर उंच मूल्याने.**

विद्यापीठाचे कुलगुरू डॉक्टर सुरेश गोसावी आणि डॉक्टर माशेलकर यांच्या हस्ते सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील योगदानाबद्दल दिवंगत माजी उपमुख्यमंत्री अजित पवार, व्यापार आणि उद्योग क्षेत्रासाठी डॉक्टर अशोक खाडे, सहकार क्षेत्रासाठी अप्पासाहेब राजळे, शिक्षण क्षेत्रासाठी डॉ. पंडित विद्यासागर तसेच कला क्षेत्रातील योगदानासाठी शमा भाटे यांना 'जीवनसाधना गौरव पुरस्कार' प्रदान करण्यात आले. महाविद्यालयीन तसंच संस्था आणि व्यक्तिगत स्तरावरही विविध पुरस्कार देण्यात आले.

**मधाचे गाव**

टिपेश्वर अभयारण्याच्या सान्निध्यात वसलेल्या अंधारवाडी गावात गोंड आणि कोलाम आदिवासी समाज वास्तव्यास आहे. 'मधाचे गाव' ही ओळख मिळाल्यानंतर या गावाच्या भिंतींवरील मधमाशांची चित्रं, पारंपरिक पार आणि पर्यटकांसाठी खुलं सभागृह विकासाची नवी कथा सांगतात... अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून.....

**महाराष्ट्र-तेलंगणा सीमेवरील अंधारवाडी या छोट्याशा आदिवासी गावाने 'मधाचे गाव' म्हणून नवी ओळख निर्माण करत विकासाचा नवा अध्याय सुरू केला आहे. खादी ग्रामोद्योग मंडळाच्या सहकार्याने सुरू झालेल्या या प्रकल्पामुळे गावकऱ्यांना स्वावलंबनाची दिशा मिळाली आहे. पूर्वी पारंपरिक पद्धतीने झाडांवरून मध गोळा करून तो अल्प दरात विकावा लागत होता. मात्र शासनाच्या मदतीने शास्त्रीय पद्धतीने मध संकलनाचे प्रशिक्षण, मधुमक्षिका पालन पेट्या आणि बाजारपेठ उपलब्ध झाली. त्यामुळे आज मधाला हजार रुपये किलोपर्यंत दर मिळू लागला आहे. या प्रकल्पामुळे महिलांचा सहभाग वाढला, उत्पन्नात वाढ झाली आणि गावात रस्ता, अंगणवाडी, घरकुले अशा सुविधा निर्माण**

**झाल्या. पर्यटनालाही चालना मिळाली असून पर्यटक मध खरेदीसह बैलगाडी सफारी व सांस्कृतिक कार्यक्रमांचा आनंद घेत आहेत. स्थानिक संसाधनांचा योग्य वापर करून गाव कसे समृद्ध करता येते, याचा आदर्श अंधारवाडीने घालून दिला आहे.आकाशवाणी बातम्यांसाठी प्रशांत जाधव पुणे.**

**भागवत**

धर्माचं रक्षण करणं सर्वांचंच कर्तव्य असून आपण धर्माचा अवलंब सोडला तर विनाश होईल असं प्रतिपादन सरसंघचालक डॉक्टर मोहन भागवत यांनी केलं आहे. ते काल नाशिक जिल्ह्यातील णमोकारतीर्थ इथं आयोजित भगवान चंद्रप्रभू जन्मकल्याणक महोत्सवात बोलत होते. णमोकार तीर्थ ऊर्जा देणारं स्थळ असल्याचं डॉक्टर भागवत म्हणाले.

**पुरस्कार**

ऊर्जा संवर्धनाच्या क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल लातूरच्या जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे यांना पुरस्कार जाहीर झाला आहे. जिल्ह्यात वीज बचतीबाबत जनजागृती, शासकीय कार्यालयांमध्ये सौर ऊर्जेचा वाढता वापर आणि विविध नाविन्यपूर्ण उपाययोजना प्रभावीपणे राबवण्यात आल्या. या प्रयत्नांची दखल घेत ऊर्जा मंत्रालयानं हा सन्मान जाहीर केला आहे.

**लसीकरण**

राज्यातील लसीकरण कार्यक्रमांतर्गत बालकांच्या लसीकरणाचं 75 टक्के उद्दिष्ट डिसेंबर अखेरपर्यंत पूर्ण झाल्याचं सार्वजनिक आरोग्य विभागाच्या आकडेवारीवरुन दिसून येत आहे. केंद्रीय आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्रालयाच्या आरोग्य व्यवस्थापन माहिती प्रणाली पोर्टलवरील आकडेवारीनुसार ही नोंद करण्यात आली आहे. राष्ट्रीय लसीकरण कार्यक्रमांतर्गत जन्मापासून एक वर्षापर्यंतच्या बालकांना बीसीजी, ओपीव्ही, पेंटाव्हॅलेंट, हिपॅटायटिस बी, रोटाव्हायरस, एमआर इत्यादि लसी देण्यात येतात.

**हवामान-**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.